महाराष्ट्र पोलीस क्राईम शोध

दि.14/8/2024/R.N.I MH.26.0531660 मुख्य संपादक.संजय रणदिवे

# सर परशुराम भाऊ महाविद्यालयात सायबर जागरुकता मोहीम

पत्रकार प्रति. सुदर्शन गोरे




पुणे, १४ ऑगस्ट २०२४: सर परशुराम भाऊ महाविद्यालयात सायबर जागरुकता मोहीम प्रभारी प्राचार्य डॉ. सुनील गायकवाड, उपप्राचार्य विज्ञान शाखा डॉ. धनंजय दिवटे, उपप्राचार्य कलाशास्त्र डॉ.विद्या आवचट, एन इ पी समन्वयक संज्योत आपटे,आय क्यु ए सी समन्वयक डॉ. मनोजकुमार देवणे, संगणकशास्त्र विभाग प्रमुख दिपक लोंढे, प्राध्यापक प्रशांत भोसले, प्राध्यापक प्रमोद चंदनशिवे, डॉ. माधुरी देशपांडे आणि सायबर वॉरियर्स क्लब समन्वयक सौ.कीर्ती गरूड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली.

महाराष्ट्र सायबर सेल आणि क्विक हील फाऊंडेशनच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या मोहिमेत महाविद्यालयातील द्वितीय वर्षाचे विद्यार्थी सायबर रॅलीद्वारे नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करत आहेत.

या मोहिमेत "आपली माहिती आपली जबाबदारी," "गणपतीच्या आशीर्वादाने स्मार्ट रहा," आणि "खोट्या कॉल्स आणि ईमेल्सपासून सावध रहा" असे घोषवाक्य वापरून डिजिटल जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

या कार्यक्रमात सायबर सुरक्षेच्या महत्त्वावर प्रकाश टाकण्यासाठी एक जिवंत देखावा देखील करण्यात आला. विविध गणेश मंडळांमध्ये सायबर वॉरियर्स स्किट्स सादर करून आणि माहिती देऊन समुदायामध्ये सायबर सुरक्षेबद्दल जागरूकता पसरवणार आहेत. सर्व मान्यवरांनी सायबर वॉरियर्सना त्यांच्या प्रयत्नांसाठी आणि त्यांच्या पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.